

**नांदेड :** पोखरणी कृषी विज्ञान केंद्राच्या कृषी विस्तार साहित्य पुस्तिका व घडी पत्रिकेचे प्रकाशन करताना मान्यवर.

# कृषी विज्ञान केंद्राच्या साहित्य पुस्तिकेचे प्रकाशन

**नांदेड, ता.२० :** भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली व जुनागड कृषी विद्यापीठ आणि क्षेत्रीय प्रकल्प संचनालय पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कृषी विज्ञान केंद्राच्या सातव्या वार्षिक विभागीय कार्यशाळेत पोखरणी कृषी विज्ञान केंद्राच्या वार्षिक प्रगती अहवाल २०२३ चे सादरीकरण वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. देविकांत देशमुख यांनी केले. दरम्यान कृषी विज्ञान केंद्राच्या विविध कृषी विस्तार साहित्य पुस्तिका व घडी पत्रिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे डॉ. यु. एस. गौतम, डॉ.किरण कोकाटे, डॉ. एस.के. रॉय, डॉ. एम. एन. अधिकारी, डॉ. बेरा, डॉ. एन एम गजेरा, डॉ.एम.बी. जाधव, डॉ.शाखेर अली आदींची प्रमुख उपस्थिती होती.